# महाराष्ट्र शासन

**ई-मेल/पत्र**

क्रमांक : खातेवि-२०११/प्र.क्र.१४६/नापू-२२
अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :-१६,जानेवारी, २०१२.

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा (गो/वा), मुंबई.
२) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
३) सर्व उप आयुक्त (पुरवठा)
४) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी. (सर्व जिल्हे)
५) अन्नधान्य वितरण अधिकारी (पुणे, नागपूर, सोलापूर)

विषय :- **सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत सवलतीच्या दराने पामतेल वितरणाची योजना (सन २०११-१२)**
**माहे नोव्हेंबर, २०११ व डिसेंबर, २०११ चे नियतन**

संदर्भ :- **१) शासन पत्रे समक्रमांक दि.१६.०७.२०११ व दि.०६.०९.२०११.**

लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत सवलतीच्या दराने पामतेल वितरीत करण्याच्या योजने अंतर्गत माहे जुलै, २०११ ते माहे डिसेंबर, २०११ करिता अन्नपुर्णा/अंत्योदय/बीपीएल आणि एपीएल योजनेच्या लाभार्थ्यांना दरमहा प्रतिशिधापत्रिका एक लिटर रू.४५/- प्रतिलिटर या दराने वितरीत करण्याच्या योजनेची अंमलबजावणी सुरु आहे.

**२.** शासन पत्र दि.१६.०७.२०११ अन्वये पामतेल वितरणाच्या योजनेच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना सूचना निर्गमित करण्यात आल्या असून त्यासोबत माहे जुलै, २०११ करीताचे जिल्हानिहाय पामतेलाचे नियतन निर्गमित करण्यात आले आहे. तसेच शासनपत्र दि.०६.०९.२०११ अन्वये माहे ऑगस्ट, सप्टेंबर आणि ऑक्टोबर, २०११ या महिन्यांचे जिल्हानिहाय नियतन माहे जुलै, २०११ च्या नियतना एवढेच असेल असे कळविण्यात आले आहे. तसेच शासनाने मंजूर केलेल्या नियतनास अनुसरुन जिल्ह्यांची गोदामनिहाय मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे पाठविण्याबाबतही सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या होत्या.

**३.** माहे जुलै ते ऑक्टोबर, २०११ या नियतन महिन्यांच्या नियतनास अनुसरुन मार्केटिंग फेडरेशनकडून प्राप्त झालेल्या व वितरीत करण्यात आलेल्या तसेच दि.३१.१२.२०११ अखेर शासनाच्या गोदामामध्ये शिल्लक असणाऱ्या पामतेलाच्या साठ्यासंबंधी क्षेत्रिय स्तरावरुन माहिती मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या माहितीचे अवलोकन करता अद्यापही काही जिल्ह्यातील शासनाच्या गोदामामध्ये वाजवीपेक्षा जास्त पामतेलाचा साठा शिल्लक असल्याचे निदर्शनास आले आहे. शिल्लक असलेला सदर साठा तातडीने लाभार्थ्यांना वितरीत करण्यात यावा. राज्यातील लाभार्थी पामतेलाच्या लाभापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**४.** माहे नोव्हेंबर, २०११ व डिसेंबर, २०११ या नियतन महिन्यांकरिता सोबतच्या विवरणपत्रात नमूद प्रमाणे जिल्हानिहाय मासिक नियतन मंजूर करण्यात येत आहे. त्याआधारे जिल्ह्याची गोदामनिहाय मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे तात्काळ पाठवावी व त्याची एक प्रत शासनास सादर करावी. नियंत्रक शिधावाटप

व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी त्यांच्या कार्यक्षेत्राची गोदामनिहाय/डिलीव्हरी सेंटर निहाय मागणी मार्केटिंग फेडरेशनकडे पाठवावी.

५. प्रस्तुत योजना राबविण्याच्या अनुषंगाने शासनपत्र दि.१६.०७.२०११ अन्वये तसेच त्यानंतर वेळोवेळी आवश्यक त्या सूचना शासन स्तरावरुन देण्यात आल्या आहेत. सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

६. माहे जुलै, २०११ ते डिसेंबर, २०११ या नियतन महिण्यांकरिता जिल्हानिहाय मंजुर नियतनापैकी जिल्ह्यातील गोदामांमध्ये प्राप्त झालेल्या व वाटप करण्यात आलेल्या पामतेलाची माहिती प्रत्येक महिन्याच्या ३ तारखेपर्यंत (मागील महिन्याची माहिती) खालील नमुन्यात शासनास सादर करावी.

**जिल्हा :- माहे ची माहिती**

| नियतनाचा महिना | राज्य शासनाने मंजूर केलेले नियतन | जिल्ह्यांनी मार्केटिंग फेडरेशनला कळविलेले नियतन | मार्केटिंग फेडरेशनकडून गोदामामध्ये प्राप्त झालेले नियतन | प्राप्त नियतनापैकी वाटप केलेले नियतन | महिना अखेर गोदामामध्ये शिल्लक पामतेलाचा साठा | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

( रमेश मु.मनाळे )
शासनाचे अवर सचिव,

**सोबत : विवरणपत्र**

**प्रत:-**

१) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित, मुंबई (मार्केटिंग फेडरेशन) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांना माहिती व उचित कार्यवाहीसाटी.

३) निवडनस्ती

**शासन पत्र क्र. खातेवि-२०११/प्रक्र.१४६/नापु-२२/दि. १६ जानेवारी, २०१२ सोबतचे विवरणपत्र**

**सवलतीच्या दराने पामतेल वितरणाच्या योजनेअंतर्गत माहे नोव्हेंबर, २०११ व डिसेंबर, २०११ या नियतन महिन्यांसाठी पामतेलाचे नियतन**

| अ.क्र. | जिल्हा/क्षेत्र | माहे नोव्हेंबर,२०११ चे नियतन (किलो लिटर) | माहे डिसेंबर,२०११ चे नियतन (किलो लिटर) |
|---|---|---|---|
| १ | मुंबई-ठाणे शि.वा.क्षेत्र | २१६२ | २१६२ |
| २ | ठाणे | ५०० | ५०० |
| ३ | रायगड | ३९२ | ३९२ |
| ४ | रत्नागिरी | २७२ | २७२ |
| ५ | सिंधुदुर्ग | १५२ | १५२ |
| ६ | नाशिक | ६८४ | ६८४ |
| ७ | अहमदनगर | ६१८ | ६१८ |
| ८ | जळगाव | ५८० | ५८० |
| ९ | धुळे | २७५ | २७५ |
| १० | नंदुरबार | २११ | २११ |
| ११ | पुणे (जि.पु.अ.) | ५७१ | ५७१ |
| १२ | पुणे (अ.वि.अ.) | ६२७ | ६२७ |
| १३ | सातारा | ४३६ | ४३६ |
| १४ | सांगली | ३७२ | ३७२ |
| १५ | सोलापूर(जि.पु.अ) | ४३५ | ४३५ |
| १६ | सोलापूर (अ.वि.अ) | १४० | १४० |
| १७ | कोल्हापूर | ५६० | ५६० |
| १८ | औरंगाबाद | ४४६ | ४४६ |
| १९ | जालना | २२८ | २२८ |
| २० | परभणी | २४२ | २४२ |
| २१ | हिंगोली | १७६ | १७६ |
| २२ | बीड | ३७४ | ३७४ |
| २३ | नांदेड | ३७६ | ३७६ |
| २४ | उस्मानाबाद | २४४ | २४४ |
| २५ | लातूर | ३०० | ३०० |
| २६ | अमरावती | ३८७ | ३८७ |
| २७ | अकोला | २०२ | २०२ |
| २८ | वाशिम | १३९ | १३९ |
| २९ | बुलढाणा | ३३० | ३३० |
| ३० | यवतमाळ | ३५७ | ३५७ |
| ३१ | नागपूर (जि.पु.अ) | २७६ | २७६ |
| ३२ | नागपूर (अ.वि.अ) | ३०६ | ३०६ |
| ३३ | वर्धा | १७७ | १७७ |
| ३४ | भंडारा | १५४ | १५४ |
| ३५ | गोंदिया | १७१ | १७१ |
| ३६ | चंद्रपूर | २८० | २८० |
| ३७ | गडचिरोली | १२८ | १२८ |
| | **एकुण** | **१४२८०** | **१४२८०** |

F:\Palm Oil allocation- Allocation Nov-Dec- 2011.xls